महाराष्ट्र टाइम्स

Wednesday, May 06, 2009

**Bar owner happy for no smoking**

Publication: Maharashtra Times, Edition: Mumbai, Supplement: Mumbai Times, Journalist: Bureau, Page No: 1, Location: Top-Center, Width(cms): 17, Height(cms): 17, Size (sq.cms): 289

# नो स्मोकिंगमुळे बारवाले खूष

**अनेक बारमध्ये 'नो स्मोकिंग'चा बोर्ड लागल्यावर येणाऱ्यांमध्ये नाराजी होती. पण, त्याचे चांगले रिझल्ट्स बार मालकांना मिळतायत.**



प्राजक्ता कासले

डीम लाइट्स. कानावर पडणारं बारीक आवाजातलं संगीत.. प्रत्येक ग्लासबरोबर आणि सिगारेटच्या झुरक्याबरोबर रंगात आलेल्या गप्पा.. बार म्हटला, की सगळा धुरकट माहौल आलाच. पण, गेल्या काही महिन्यांपासून सरकारने स्मोकिंगवर आणलेल्या गदेमुळे या माहौलामधला धूर गायब झाला. त्याबाबत ग्राहकांकडून आजही नाराजी दिसते. पण, सरप्राइजिंगली बारमालक मात्र या सरकारी निर्णयावर जाम खूष आहेत.

मुंबईला स्मोकिंग फ्री सिटी बनवण्यासाठी हिलीस सिखसारिया इन्स्टिट्यूट, टाटा हॉस्पिटलचे डॉ. सुरेंद्र शास्त्री आणि सहकारी तसंच महानगरपालिका एकत्रितपणं काम करतायत. नो स्मोकिंग संदर्भात हॉटेल आणि बारमालकांचं म्हणणं ऐकण्यासाठी टाटा मेमोरिअल हॉस्पिटलमध्ये मिटिंग होती. मात्र स्मोकिंगच्या इफेक्टमुळे जेरीस आलेल्या बारमालकांनी तक्रारींपेक्षा त्यांना झालेला आनंदच व्यक्त केलाय.

नो स्मोकिंगमुळे अनेक बार आता स्वच्छ झालेत. स्मोक न करणाऱ्यांनी तर याचं स्वागत केलंय, असं बार मालकांनी सांगितलं. बारमधल्या वेटर-मॅनेजर यांनीही सुटकेचा 'निःश्वास' सोडलाय. 'या धुरात एक-दोन तासांपेक्षा जास्त वेळ राहता यायचं नाही. घरी आल्यावर शर्टला धुराचा वास असायचा', असं हॉटेलमालक विश्वपाल शेट्टी म्हणाले. इतकंच नव्हे, 'या सिगारेटच्या धुरामुळे बारचे एसीही चोकअप व्हायचे. त्याच्या दुरुस्तीला बराच खर्च यायचा. त्याची आता बचत होतेय', असं प्रभादेवी इथल्या संकेत हॉटेलचे मालक किरण भल्ला म्हणाले. 'याशिवाय सिगारेट्स मागवण्यासाठी दोन पोऱ्यांना एक्स्ट्रा काम लागायचं. तोही पैसा वाचतोय', असं ते म्हणाले. या निर्णयामुळे पूर्वीपेक्षा कमी वेळात टेबल रिकामं होतायत. पण, बाहेर सिगारेट ओढून येणारेही आहेतच. त्यामुळे काही टेबल्स एंगेज होतात, असाही मुद्दा मांडला गेला. सिगारेटची थोटकं, सिगारेटमुळे जळणारे सोफा यातून मात्र मालकांची सुटका झाली आहे. हॉटेल बाहेर नो स्मोकिंग झोनचा मोठा बोर्ड लावून हॉटेलचं ब्रँडिंग करणार असल्याचं वरळीच्या रविराज हॉटेलचे मालक सुहास शेट्टी यांनी सांगितलं.

prajakta.kasale@timesgroup.com

## दंड वाढवा

हॉटेल व्यावसायिकांनी त्यांच्या काही तक्रारीही मांडल्या. नो स्मोकिंगचा अर्थ ग्राहकांना कळला. तरी दोन पेग नंतर स्मोकिंगसाठी होणारी भांडणं वाढतायत. रात्री पालिकेचे अधिकारी नसतात आणि पोलिस त्यांच्या पोशाखात येणं व्यवसायाच्या दृष्टीने योग्य नाही. शिवाय महानगरपालिका हॉटेलमालकांनाच दंड करते, त्यामुळे आम्ही स्वतःहून फोन करायला कचरतो, असं काहींनी सांगितलं. हॉटेलमालकांनी फोन करून बोलावल्यास त्यांना दंड करू नये, तसंच २०० रुपयांचा दंड वाढवावा, अशी मागणी त्यांनी केली. या मागण्यांची दखल घेऊ असं पालिकेच्या असिस्टण्ट हेल्थ ऑफिसर डॉ. प्रणिता टिपरे यांनी सांगितलं.